212

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# आदिवासी कुटुंब नियोजन



आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

२८ क्वीन्स् गार्डन, पुणे ४११ ००१.

# आदिवासींच्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे मूल्यमापन

## सन २००९-१०

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा विभागामार्फत कुटुंब कल्याण कार्यक्रम राबविण्यात येतो.

परंतु या कार्यक्रमातील कुटुंब नियोजन या महत्त्वाच्या योजनेचा उपयोग आदिवासींनी फारसा करून घेतलेला नाही असे इतर विषयांच्या सर्व्हेक्षणावेळी केलेल्या पहाणीतून वेळोवेळी निदर्शनास आल्याने आदिवासी क्षेत्रातील कुटुंब नियोजनाचे मूल्यमापन करण्यासाठी नाशिक व बुलढाणा जिल्ह्यातील २४८ कुटुंबांची आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम ह्या कक्षाकडून पहाणी करण्यात आली आहे. सदर मूल्यमापनाचे काम श्रीमती ए. एस. काळे (प्र. उपसंचालक), श्री. एस. एम. यादव (संशोधन अधिकारी), श्री. पी. बी. कुदळे (संशोधन सहाय्यक), श्री. पवार (अन्वेषक), यांनी केले असून सदर अहवाल लेखनाचे काम श्रीमती काळे यांनी पूर्ण केले आहे.

सदर मूल्यमापन पहाणी अहवालाचा आदिवासींच्या कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे नियोजन करण्याऱ्या अधिकाऱ्यांना तसेच आरोग्यासाठी काम करणाऱ्या संस्थाना उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

दिनांक :
ठिकाण : पुणे

**(डॉ. अरविंद कुमार झा)**
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

# :: अनुक्रमणिका ::


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ |
| १. | मूल्यमापनाचे उद्देश | १ |
| २. | कार्यपध्दती | २ |
| ३. | पृथःकरण | ३ |
| | ३.१) क्षेत्रीय पहाणी | ३ |
| | ३.२) स्त्रीयांचे प्रमाण | ५ |
| | ३.३) साक्षरतेचे प्रमाण | ५ |
| | ३.४) कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय | ६ |
| | ३.५) कुटुंबाचे उत्पन्न | ७ |
| | ३.६) भूधारणा | ८ |
| | ३.७) पशुधन | ९ |
| | ३.८) घरांची स्थिती | १० |
| | ३.९) उपचार पध्दती | ११ |
| ४. | कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे विश्लेषण | १३ |
| | ४.१) कुटुंबात असलेली जोडपी | १३ |
| | ४.२) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | १४ |
| | ४.३) लिंग निहाय कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | १५ |
| | ४.४) अपत्यानुसार शस्त्रक्रिया | १७ |
| | ४.५) जननक्षम जोडपी व शस्त्रक्रिया | १९ |
| | ४.६) २ अपत्यावर शस्त्रक्रिया | २१ |
| | ४.७) साक्षरता व कुटुंब नियोजन | २३ |

| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ४.८) कुटुंबाचे उत्पन्न व कुटुंब नियोजन | २५ |
| | ४.९) व्यवसाय व कुटुंब नियोजन | २७ |
| | ४.१०) जमात निहाय कुटुंब नियोजन | २८ |
| | ४.११) कुटुंब नियोजन न करण्याची कारणे | ३० |
| | ४.१२) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेव्यतिरिक्तच्या इतर साधनांचा वापर | ३३ |
| | ४.१३) कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे विपरीत परिणाम | ३५ |
| | ४.१४) अयशस्वी शस्त्रक्रिया | ३६ |
| | ४.१५) ए.एन.एम च्या भेटी | ३६ |
| | ४.१६) कुटुंब नियोजनाच्या आदिवासींच्या पारंपरिक पध्दती | ३७ |
| | ४.१७) मानधन | ३७ |
| ५. | निष्कर्ष | ३८ |
| ६. | काही अडचणी व शिफारसी | ३९ |
| ७. | प्रपत्र | |

# प्रकरण क्रमांक - १

## १.१ कुटुंब नियोजन कार्यक्रमाच्या मूल्यमापनाचे उद्देश

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत संपूर्ण राज्यभर सर्व जननक्षम जोडप्यांसाठी कुटुंब नियोजन हा कार्यक्रम राबविण्यात येतो. दरवर्षी शासनाकडून कुटुंब नियोजनाचे उद्दीष्ट प्रत्येक जिल्ह्याला देण्यात येते व सर्वसाधारणपणे ८० ते ९० % पर्यंत ते पूर्ण करण्यात येते. काही जिल्ह्यांमध्ये मात्र कुटुंब नियोजनाचे उद्दीष्ट ७०% च्या आसपासच पूर्ण होते.

तसेच आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे २ अपत्यानंतर केलेले कुटुंब नियोजन. २ अपत्यांवर केलेल्या कुटुंब नियोजनाचे उद्दीष्ट २००८-०९ ह्या वर्षात ठाणे जिल्हा ५०%, नंदुरबार जिल्हा ५७% व नाशिक जिल्हा ६६% पूर्ण झाल्याचे दिसून येते. हे तीनही जिल्हे आदिवासी बहुल जिल्हे आहेत.

एकूणच आदिवासी जिल्ह्यातील कुटुंब नियोजन ही मोठी समस्या आहे. कुटुंबाच्या मोठ्या आकारामुळे उद्‌भवणाऱ्या सर्व प्रश्नांना आदिवासींना तोंड द्यावे लागत असल्याने कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम आदिवासी क्षेत्रात कसा राबविला गेला आहे याची पहाणी करून मूल्यमापन करण्याचे काम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून २००९-१० या वर्षात हाती घेण्यात आले.

## प्रकरण क्रमांक - २

# का र्य प द्ध ती

कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी बुलढाणा व नाशिक ह्या दोन जिल्ह्यातील २४८ कुटुंबांची पहाणी करण्यात आली. त्यासाठी ६ तालुक्यातील २१ गावांना भेटी देण्यात आल्या व विहीत केलेल्या प्रपत्रात आदिवासी कुटुंबांचे शिक्षण, भूधारणा, उत्पन्नाचा स्तर, कुटुंबाचे नियोजन करण्याची वा न करण्याची कारणे तसेच आरोग्य सेवेशी त्यांचा असलेला संबंध कुटुंब नियोजनाच्या आदिवासींच्या स्वतःच्या पद्धती इत्यादी बाबींविषयी माहिती घेण्यात आली.

२१ गावातील २४८ कुटुंबाना भेटी देण्याचे काम या कार्यालयातील पथकाकडून करण्यात आले.

# प्रकरण क्रमांक - ३

# पृथःकरण

## ३.१ क्षेत्रीय पहाणी

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथील एकात्मिक क्षेत्रीय विकास कार्यक्रम कक्षातील खालील पथकाने कुटुंब नियोजनाच्या पहाणीचे काम २००९-१० ह्या वर्षात पूर्ण केले.

**पथक**

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री. एस. एम. यादव | संशोधन अधिकारी |
| २) | श्रीमती. ए. एस. काळे | प्र. उपसंचालक |
| ३) | श्री. अरविंद गायकवाड | संशोधन सहाय्यक |
| ४) | श्री. बी. जी. कुदळे | संशोधन सहाय्यक |
| ५) | श्री. पाटणकर | संशोधन सहाय्यक |
| ६) | श्री. रविंद्र पवार | अन्वेषक |

वरील पथकाकडून खालील गावांची क्षेत्रीय पहाणी करण्यात आली.

**तक्ता क्रमांक - १**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावे | पहाणी केलेल्या कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४ | ४८ |
| | | २) पेठ | २ | ०९ |
| | | ३) सुरगाणा | २ | १६ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३ | ३७ |
| | | **एकूण जिल्हा** | **११** | **११०** |
| २) | बुलढाणा | १) जळगाव - जामोद | ७ | ६२ |
| | | २) संग्रामपूर | ३ | ७६ |
| | | **एकूण जिल्हा** | **१०** | **१३८** |
| | | **एकूण** | **२१** | **२४८** |

# तक्ता क्रमांक - २

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | १) त्रींगलवाडी २) खंबाळे<br>३) पारदेवी ४) टाकेघोटी |
| | | २) पेठ | १) सावर्णा २) जगनोडी |
| | | ३) सुरगाणा | १) सांबार खळ २) खोकर विहीर |
| | | ४) दिंडोरी व निफाड | १) नव्हासी २) अक्राळे ३) जानोरी |
| २) | बुलढाणा | १) जळगाव - जामोद | १) चारबन २) रायपूर ३) उमापूरपाडा<br>४) हनूवतखेड ५) गारपेठ (जुना)<br>६) गारपेठ (नवा) ७) रसूलपूर |
| | | २) संग्रामपूर | १) पिंगळी बु. २) वसाळी ३) सालवण |

## ३.२ स्त्रियांचे प्रमाण

पहाणी केलेल्या २४८ आदिवासी कुटुंबामध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे. २४८ कुटुंबात पुरुष ५६३ असून ६८५ स्त्रिया आहेत.

नाशिक जिल्ह्यात १००० पुरुषांमागे १००९ स्त्रिया असे प्रमाण आहे. पण बुलढाणा जिल्ह्यात मात्र स्त्रियांचे प्रमाणापेक्षा पुरुषांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते.

## ३.३. साक्षरतेचे प्रमाण

पहाणी केलेल्या एकूण २४८ आदिवासी कुटुंब प्रमुखांपैकी ४२% कुटुंब प्रमुख साक्षर असून ५८% निरक्षर आहेत.

नाशिक जिल्ह्यात ४०% कुटुंब प्रमुख साक्षर असून ६०% कुटुंब प्रमुख निरक्षर आहेत. तर बुलढाणा जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ४४% असून ५६% कुटुंब प्रमुख निरक्षर आहेत.

यावरून असे दिसून येते की, नाशिक व बुलढाणा जिल्ह्यांच्या कुटुंब प्रमुखांच्या साक्षरतेत फारशी तफावत नाही. मात्र साक्षरतेचा तालुकानिहाय विचार केला तर मोठी तफावत आढळते.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात ३५% तर पेठ तालुक्यात ७७% कुटुंब प्रमुख साक्षर आहेत. सुरगाणा तालुक्यात ५०% कुटुंबप्रमुख साक्षर असून दिंडोरी व निफाडमध्ये मिळून फक्त ३२% कुटुंब प्रमुख साक्षर आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव - जामोद तालुक्यातील केवळ २५% कुटुंब प्रमुख साक्षर आहेत तर संग्रामपूर तालुक्यात हे प्रमाण ५९% आहे.

# ३.४ कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय

आदिवासींच्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी माहिती घेतलेल्या २४८ कुटुंबाचे व्यवसायानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक - ३**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंब संस्था | शेती | शेतमजुरी | मजुरी | नोकरी | व्यवसाय | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | १४ | २५ | ६ | २ | १ | - |
| | | २) पेठ | ०९ | ०९ | - | - | - | - | - |
| | | ३) सुरगाणा | १६ | १३ | ३ | - | - | - | - |
| | | ४) दिंडोरी निफ़ाड | ३७ | ६ | १९ | ११ | - | १ | - |
| | | **एकूण नाशिक** | **११०** | **४२** | **४७** | **१७** | **२** | **२** | - |
| २) | बुलढाणा | १) जळगाव-जामोद | ६२ | २२ | २५ | १२ | २ | १ | - |
| | | २) संग्रामपूर | ७६ | १६ | २५ | २९ | ४ | २ | - |
| | | | १३८ | ३८ | ५० | ४१ | ६ | ३ | - |
| | | **एकूण बुलढाणा** | **२४८** | **८०** | **९७** | **५८** | **८** | **५** | - |

एकूण २४८ कुटुंबांपैकी ८० म्हणजे ३३% कुटुंबे शेती व्यवसायात असून ३९% शेतमजुरीत २३% मजुरीत गुंतलेली आहेत. फक्त ३% कुटुंबे नोकरीमध्ये व २०% कुटुंबे व्यवसायात गुंतलेली आढळली.

नाशिक जिल्ह्यात ११० कुटुंबाची माहीती घेतली असता ३८% कुटुंबे शेती करत असून ४३% शेतमजुरी व १५% कुटुंबे मजुरी करणारी असल्याचे आढळले. नोकरी व व्यवसाय करणारी प्रत्येकी २% कुटुंबे आहेत.

बुलढाणा जिल्ह्यात एकूण १३८ कुटुंबांची माहिती घेतली असता २८% कुटुंबांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून ३६% कुटुंबे शेतमजुरी व ३०% कुटुंबे मजुरी करणारी आहेत असे आढळले. नोकरी करणारी फक्त ४% कुटुंबे असून व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण २% आहे.

# ३.५ कुटुंबाचे उत्पन्न

पहाणी केलेल्या नाशिक व बुलढाणा या दोन्ही जिल्ह्यात कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती घेतली असता जवळजवळ ९५% कुटुंबे अगदी तळाच्या उत्पन्न स्तरातील असल्याचे दिसले त्यांच्या वार्षिक उत्पन्नाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

## वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

**तक्ता क्रमांक - ४**

**(रुपये हजारात)**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | ० ते २० | २० ते ४० | ४० ते ६० | ६०+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपूरी | ४८ | ४४ | ३ | १ | - |
| | | २) पेठ | ०९ | ८ | १ | - | - |
| | | ३) सुरगाणा | १६ | १६ | - | - | - |
| | | ४) दिंडोरी + निफाड | ३७ | ३६ | १ | - | - |
| | | **एकूण नाशिक जिल्हा** | **११०** | **१०४** | **५** | **१** | **-** |
| २) | बुलढाणा | १) जळगाव - जामोद | ६२ | ५९ | २ | १ | - |
| | | २) संग्रामपूर | ७६ | ७२ | ४ | - | - |
| | | **एकूण बुलढाणा जिल्हा** | **१३८** | **१३१** | **६** | **१** | **-** |
| | | **एकूण** | **२४८** | **२३५** | **११** | **२** | **-** |

पहाणी केलेल्या २४८ कुटुंबापैकी ९५% कुटुंबे रुपये ० ते २० हजार ह्या उत्पन्न गटात येतात. ४% कुटुंबाचे उत्पन्न रुपये २० ते ४० हजार होते.

नाशिक जिल्ह्यात रुपये ० ते २० हजार ह्या उत्पन्न गटात ९५% कुटुंबे असून बुलढाणा जिल्ह्यात ह्या उत्पन्न गटात ९१% कुटुंबे आहेत.

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील १००% कुटुंबे रुपये ० ते २० हजार ह्या गटात असून दिंडोरी व निफाड तालुक्यातील ९७% कुटुंबे ह्या उत्पन्न गटात मोडतात.

बुलढाणा जिल्ह्यात जळगाव - जामोद व संग्रामपूर ह्या दोन्ही तालुक्यात ९५% कुटुंबे रु.१ ते २० हजार या उत्पन्न गटात आढळली.

# ३.६ भूधारणा

पहाणी केलेल्या कुटुंबापैकी ५२% कुटुंबे भूमिहीन आढळली असून ४८% कुटुंबाकडे जमीन आहे मात्र ३८% कुटुंबेच शेती हा प्रमुख व्यवसाय करतात, जमीन असलेल्या सर्व कुटुंबाना शेती हा प्रमुख व्यवसाय म्हणून करता येत नाही.

कुटुंबाची भूधारणेची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

## तक्ता क्रमांक - ५

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब संख्या | भूमिहीन | भूधारक – क्षेत्र हे. आर – जिरायत | भूधारक – क्षेत्र हे. आर – बागायत | भूधारक – मालकीची | भूधारक – खंडाची | भूधारक – इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | २३ | ४३.३० | १.२८ | ४४.५८ | - | - |
| | | २) पेठ | ०९ | ०० | १२.०० | - | १२.०० | - | ७.०० वन |
| | | ३) सुरगाणा | १६ | ०२ | ४४.१० | - | ४४.१० | - | - |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | २६ | १९.३५ | - | १९.३५ | - | - |
| | | **एकूण** | **११०** | **५१** | **११८.७५** | **१.२८** | **१२०.०३** | **-** | **७.०० वन** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६२ | ३३ | ५१.७२ | १.०० | ५२.७२ | - | - |
| | | संग्रामपूर | ७६ | ४५ | ४०.८० | २.०० | ४२.८० | - | - |
| | | **एकूण** | **१३८** | **७८** | **९२.५२** | **३.००** | **९५.५२** | **-** | **-** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, नाशिक जिल्ह्यात ५४% कुटुंबे भूधारक असून बुलढाणा जिल्ह्यात ४३% कुटुंबे भूधारक आहेत.

नाशिक जिल्ह्यात पेठ तालुक्यात पहाणी केलेली सर्व कुटुंबे भूधारक आहेत तर दिंडोरी व निफाड तालुक्यातील फक्त ३०% कुटुंबे भूधारक आहेत. इगतपुरी तालुक्यात भूधारणेचे प्रमाण ५३% असल्याचे दिसले असून सुरगाणा तालुक्यात हे प्रमाण ८८% आहे.

बुलढाणा जिल्ह्यात जळगाव-जामोद तालुक्यात ४७% कुटुंबे भुधारक असून संग्रामपूर मध्ये ४०% कुटुंबे भूधारक आहेत.

ह्या दोन्ही जिल्ह्यात भूधारणेचे सरासरी प्रमाण १.६६ हेक्टर असे असून नाशिक जिल्ह्यात हे २.०३ हेक्टर आहे व बुलढाणा जिल्ह्यात हे प्रमाण १.५८ हेक्टर आहे.

नाशिक जिल्ह्यात भूधारणेचे प्रमाण सर्वात जास्त सुरगाणा तालुक्यात आढळले असून ते सरासरी ३.१५ हेक्टर प्रती कुटुंब असून सर्वात कमी दिंडोरी व निफाड तालुक्यात १.१३ हेक्टर असे आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव - जामोद तालुक्यात सरासरी भूधारणा १.८१ हेक्टर प्रती कुटुंब असून संग्रामपूर तालुक्यात ती सरासरी १.३३ हेक्टर प्रती कुटुंब आहे.

# ३.७ पशुधन

नाशिक व बुलढाणा जिल्ह्यातील २४८ कुटुंबधारकांकडे मिळून ६६ गायी, १०९ बैल, २१ म्हशी, १०५ शेळया व ३३ रेडे असल्याचे आढळले.

पहाणी केलेल्या कुटुंबाकडे आढळलेल्या पशुधनाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

## कुटुंबाकडे उपलब्ध पशुधन

### तक्ता क्रमांक - ६

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | लाभार्थी कुटुंबे | पशुधन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गाय | बैल | म्हैस | शेळया | रेडा | इतर |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | २३ | ३४ | ३ | २६ | - | - |
| | | २) पेठ | ०९ | २ | १२ | - | १३ | २ | - |
| | | ३) सुरगाणा | १६ | ५ | २ | १ | - | २८ | - |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | १४ | ९ | - | ९ | २ | - |
| | | **नाशिक जिल्हा एकूण** | **११०** | **४४** | **५७** | **४** | **४८** | **३२** | - |
| २) | बुलढाणा | जळगाव- जामोद | ६२ | १६ | ३४ | १४ | ३७ | १ | - |
| | | संग्रामपूर | ७६ | ०६ | १८ | ३ | २० | - | - |
| | | **बुलढाणा जिल्हा एकूण** | **१३८** | **२२** | **५२** | **१७** | **५७** | **१** | - |
| | | **एकूण** | **२४८** | **६६** | **१०९** | **२१** | **१०५** | **३३** | - |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, इगतपुरी तालुक्यात २ कुटुंबामागे १ गाय असून पेठ तालुक्यात ४ कुटुंबामागे व सुरगाणा तालुक्यात ३ कुटुंबामागे १ गाय असे प्रमाण आहे. तर दिंडोरी व निफाडमध्ये मिळून ५ कुटुंबामागे २ गायी असे प्रमाण आहे.

बैलांची संख्या पेठ तालुक्यात सर्वात जास्त असून इगतपुरी तालुक्यात ३ कुटुंबामागे २ बैल, पेठ तालुक्यात ३ कुटुंबामागे ४ बैल, सुरगाणा तालुक्यात ८ कुटुंबाकडे १ बैल तर दिंडोरी व निफाड तालुक्यात ४ कुटुंबाकडे १ बैल असे प्रमाण आहे.

म्हशींची संख्या बुलढाणा जिल्ह्यात जळगाव - जामोद तालुक्यात सर्वात जास्त आहे. इगतपूरी व सुरगाणा तालुक्यात १६ कुटुंबामागे १ म्हैस आहे. पेठ, दिंडोरी व निफाड तालुक्यात म्हशी नाहीत. जळगाव जामोद तालुक्यात ४ कुटुंबामागे १ म्हैस तर संग्रामपूर तालुक्यात २५ कुटुंबात १ म्हैस असे प्रमाण आहे.

शेळ्यांची संख्याही पेठ तालुक्यात सर्वात जास्त असून हे प्रमाण २ कुटुंबामागे ३ शेळ्या असे आहे. इगतपुरी तालुक्यात २ कुटुंबामागे १ शेळी व बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव - जामोद तालुक्यात ३ कुटुंबामागे २ शेळ्या व संग्रामपूर तालुक्यात ४ कुटुंबामागे १ शेळी असे प्रमाण असल्याचे आढळते.

## ३.८ घरांची स्थिती

पहाणी केलेल्या २४८ कुटुंबापैकी ७७% कुटुंबाची घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. एकूण कच्ची घरे असलेल्या घरांपैकी ७०% कुटुंबाची घरे पूर्ण कच्ची असून ३०% कुटुंबांची घरे अर्ध कच्ची आहेत. घरांची स्थिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक - ७**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकुण कुटुंबे | घरांची स्थिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कच्चे | | पक्के | |
| | | | | पूर्ण कच्चे | अर्ध कच्चे | स्वतःचे | शासनाचे |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | २७ | - | १९ | २ |
| | | २) पेठ | ०९ | ०४ | - | ०४ | १ |
| | | ३) सुरगाणा | १६ | ०६ | - | १० | - |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | २७ | - | ०७ | ३ |
| | | **एकूण नाशिक** | **११०** | **६४** | **-** | **४०** | **६** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६२ | ३५ | २५ | २ | - |
| | | संग्रामपूर | ७६ | ३६ | ३१ | ८ | १ |
| | | **एकूण बुलढाणा** | **१३८** | **७१** | **५६** | **१०** | **१** |
| | | **एकूण** | **२४८** | **१३५** | **५६** | **५०** | **७** |

## ३.९ उपचार पद्धती

आदिवासी कुटुंबांनी दिलेल्या माहितीनुसार आता बरीचशी कुटुंबे दवाखान्यात जाऊन उपचार घेतात असे दिसत असले तरी प्रत्यक्षात कितीतरी आदिवासी कुटुंबे वैदू, भगत देवर्षी यांचेकडे जात असल्याचे निदर्शनास येते. याला शिक्षणाचा अभाव हे एक कारण असले तरी दळण-वळणाच्या अपुऱ्या सुविधा हे देखील प्रमुख कारण आहे. दुर्गम भागातील वास्तव्यामुळे डॉक्टरापर्यंत रुग्णास नेणे दुरापास्त होते व त्यामुळे नाईलाजाने परंपरेला शरण जाऊन आदिवासी हा मार्ग अवलंबतात.

पहाणी केलेल्या २४८ कुटुंबांपैकी ८५% कुटुंबे दवाखान्यात उपचार घेतात असे दिसते. केवळ घरगुती औषधे करणारी व वैदुची औषधे वापरणारी प्रत्येकी १०% कुटुंबे असून त्याबरोबर २४% कुटुंबे आजही भगताचा आधार घेतात असे समजते.

खाली दिलेल्या तक्त्यात विविध औषधोपचार पद्धती स्वीकारणाऱ्या कुटुंबाची माहिती दिली आहे.

### उपचार पद्धती

### तक्ता क्रमांक - ८

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकुण कुटुंबे | उपचार पद्धती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घरगुती | वैदु | भगत | दवाखाना |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | १२ | ११ | १४ | ४७ |
| | | २) पेठ | ०९ | ०२ | ०२ | ०२ | ०९ |
| | | ३) सुरगाणा | १६ | १ | ०१ | १ | १६ |
| | | ४) दिंडोरी /निफाड | ३७ | १० | १० | १० | ३६ |
| | | **एकूण नाशिक** | **११०** | **२५** | **२४** | **२७** | **१०८** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६२ | - | १ | १९ | ४२ |
| | | संग्रामपूर | ७६ | १ | - | १३ | ६२ |
| | | **एकूण बुलढाणा** | **१३८** | **१** | **१** | **३२** | **१०४** |
| | | **एकूण** | **२४८** | **२६** | **२५** | **५९** | **२१२** |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, नाशिक जिल्ह्यातील बहुतेक सर्व आदिवासी कुटुंबे दवाखान्यात उपचार घेतात. बुलढाणा जिल्ह्यात मात्र ७५% कुटुंबेच दवाखान्यात उपचार घेतात.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील सर्व कुटुंबे दवाखान्यात उपचार घेत असली तरी २९% कुटुंबे घरगुती उपचार करतात तसेच वैदुचे उपचारही घेतात. पेठ तालुक्यातील परिस्थिती हिच आहे. सुरगाणा तालुक्यात मात्र इतर उपचार घेणारांचे प्रमाण ६% आहे. दिंडोरी व निफाड तालुक्यात मिळून २७% कुटुंबे भगत, वैदू असे इतर उपचार घेतात.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद तालुक्यात ६८% कुटुंबे दवाखान्यात उपचार घेत असून ३१% कुटुंबे भगताकडे उपचार घेतात. संग्रामपूर तालुक्यात ८२% कुटुंबे दवाखान्यात उपचार घेत असून १७% कुटुंबे भगताकडे जातात.

वरील सर्व आकडेवारीवरून असे लक्षात येते की, दवाखान्याचा फायदा घेतला जात असला तरी भगताकडे जाण्याची मानसिकता अजून पूर्णपणे संपुष्टात आलेली नाही.

-----------------------

# प्रकरण क्रमांक - ४

# कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे विश्लेषण

## ४.१ कुटुंबात असलेली जोडपी

पहाणी केलेल्या एकूण २४८ कुटुंबात एकूण २८६ जोडपी असल्याचे आढळले. पैकी २०६ कुटुंबे १ जोडपे असलेली असून ३६ कुटुंबे २ जोडपी असलेली आहेत व ३ जोडपी असलेल्या कुटुंबाची संख्या फक्त ६ आहे. पेठ तालुक्यात एका कुटुंबात असलेल्या जोडप्यांचे प्रमाण सर्वात जास्त असून सरासरी प्रत्येक कुटुंबात २ जोडपी आहेत. ह्या विषयी खालील तक्त्यात माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक - ८**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकुण कुटुंबे | कुटुंबात असलेली जोडपी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | ४० | ७ | १ |
| | | २) पेठ | ०९ | ०३ | ४ | २ |
| | | ३) सुरगाणा | १६ | ११ | ४ | १ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | ३० | ६ | १ |
| | | **एकूण नाशिक जिल्हा** | **११०** | **८४** | **२१** | **५** |
| २) | बुलढाणा | जळगाव जामोद | ६२ | ५३ | ०९ | - |
| | | संग्रामपूर | ७६ | ६९ | ०६ | १ |
| | | **एकूण बुलढाणा जिल्हा** | **१३८** | **१२२** | **१५** | **१** |

## ४.२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

पहाणी केलेल्या एकूण २४८ कुटुंबात २९६ जोडपी असून त्यापैकी १५२ जोडप्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली असल्याचे आढळले. म्हणजेच एकूण जोडप्यांपैकी ५१% कुटुंबानी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

नाशिक जिल्ह्यात हे प्रमाण ५८% असून बुलढाणा जिल्ह्यात ४५% आहे.

कुटुंबे व त्यापैकी झालेल्या कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया याबाबतची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक - ९**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | पहाणीची एकुण कुटुंबे | कुटुंबातील जोडपी | पैकी शस्त्रक्रिया केलेली जोडपी % | शस्त्रक्रिया न केलेली जोडपी |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | ५७ | ३४ (६०) | २३ |
| | | २) पेठ | ०९ | १७ | ११ (६५) | ०६ |
| | | ३) सुरगाणा | १६ | २२ | १३ (५९) | ०९ |
| | | ४) दिंडोरी/निफाड | ३७ | ४५ | २५(५६) | २० |
| | | **एकूण नाशिक जिल्हा** | **११०** | **१४१** | **८३(५९)** | **५८** |
| २) | बुलढाणा | जळगाव जामोद | ६२ | ७१ | ३४(४८) | ३७ |
| | | संग्रामपूर | ७६ | ८४ | ३५(४२) | ४९ |
| | | **एकूण बुलढाणा जिल्हा** | **१३८** | **१५५** | **६९(४५)** | **८६** |

नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यात ६५% कुटुंबांनी शस्त्रक्रिया करून घेतल्या असून इगतपुरी तालुक्यातील ६०% कुटुंबांच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत.सुरगाणा तालुक्यात हे प्रमाण ५९% असून दिंडोरी व निफाड तालुक्यात हे प्रमाण ५६% असल्याचे आढळले.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद तालुक्यात ४८% कुटुंबांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्या असून संग्रामपूर तालुक्यात हे प्रमाण फक्त ४२% आहे.

## ४.३ लिंगनिहाय कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

नाशिक व बुलढाणा जिल्ह्यात करण्यात आलेल्या एकूण कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांच्या आकडेवारी वरून असे लक्षात येते की, ८७.५% शस्त्रक्रिया ह्या स्त्रियांच्या झाल्या असून पुरुषनसबंदीचे प्रमाण फक्त १२.५% आहे.


नाशिक जिल्ह्यात स्त्रियांच्या शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण ८२% असून बुलढाणा जिल्ह्यात ते ९४% आहे.

लिंगनिहाय कुटुंब शस्त्रक्रियांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक १०**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | स्त्रियांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | पुरुषांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया (%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ३४ | ३४ | - |
| | | २) पेठ | ११ | ०५ | ०६ (५५) |
| | | ३) सुरगाणा | १३ | ०४ | ०९(६९) |
| | | ४) दिंडोरी / निफाड | २५ | २५ | - |
| | | **एकूण** | **८३** | **६८** | **१५(१८)** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ३४ | ३३ | १(३) |
| | | संग्रामपूर | ३५ | ३० | ५(१४) |
| | | एकूण | ६९ | ६३ | ६(९) |
| | | **एकूण** | **१५२** | **१३१** | **२१(१४)** |

वरील तक्त्यावरून नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, दिंडोरी व निफाड तालुक्यातील १००% शस्त्रक्रिया स्त्रियांच्या झालेल्या असल्याचे आढळले. पेठ तालुक्यात मात्र स्त्रियांच्या शस्त्रक्रियांचे प्रमाण ४५% आहे. तर सुरगाणा तालुक्यात मात्र फक्त ३०% स्त्रियांच्या शस्त्रक्रिया झालेल्या असून उर्वरीत ७०% शस्त्रक्रीया पुरुषांच्या झाल्या असल्याचे आढळते.




बुलढाणा जिल्ह्यात जळगाव-जामोद तालुक्यात झालेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी ९७% शस्त्रक्रिया स्त्रियांच्या असून केवळ ३% शस्त्रक्रिया पुरुषांच्या झाल्या आहेत. संग्रामपूर तालुक्यात स्त्री शस्त्रक्रियांचे प्रमाण ८६% आहे.

सुरगाणा तालुक्यासारखा एखादा सन्माननीय अपवाद वगळता इतर सर्व ठिकाणी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया स्त्रियांच्याच झालेल्या दिसतात.

स्त्रियांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे पुरुषांच्या शस्त्रक्रियांच्या मानाने अधिक अवघड व गुंतागुंतीचे असले तरी शारीरिक कमजोरी येईल व अंग मेहनतीची कामे करता येणार नाहीत ह्या गैरसमजुतीपायी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्यास पुरुष तयार होत नाहीत. परीणामी स्त्री शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढते. कारण कुटुंब नियोजन केले नाही तर वाढत जाणाऱ्या कुटुंबाचा भार तिलाच वहावा लागतो म्हणुन त्रास झाला तरी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यास स्त्रिया पुढे येतात.

ह्या बाबत दुसरे असे की, पुरुषांची जननक्षमता वयाच्या ७५ वर्षापर्यंत सुध्दा टिकून असते परंतु स्त्रियांची जननक्षमता क्वचीत अपवाद वगळता ४५ ते ५० वयोगटात संपुष्टात येते. त्यामुळें एक पुरुषाची शस्त्रक्रिया ही ३ स्त्रियांच्या शस्त्रक्रिये बरोबरीचे असल्याचे मानले जाते.

म्हणून पुरुषनसबंदी होणे महत्त्वाचे आहे मात्र वरील पाहणीमध्ये सुरगाणा तालुक्या व्यतिरीक्त हे काम कोठे झाल्याचे जाणवत नाही.


## ४.४ अपत्यानुसार शस्त्रक्रिया

पाहणी केलेल्या जोडप्यांपैकी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया होण्याचे प्रमाण जरी ६०% पेक्षा जास्त दिसत असले तरी देखील सदर शस्त्रक्रिया किती अपत्यानंतर करून घेण्यात आल्या हे पाहणेदेखील गरजेचे आहे. अपत्यानुसार केलेल्या शस्त्रक्रियांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक - ११**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेली जोडपी | अपत्यनिहाय शस्त्रक्रिया | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ३४ | - | ४ | १३ | ११ | ५ | १ | - | - |
| | | २) पेठ | ११ | १ | ५ | ४ | १ | - | - | - | - |
| | | ३) सुरगाणा | १३ | - | ५ | ४ | २ | - | २ | - | - |
| | | ४) दिंडोरी / निफाड | २५ | ६ | १२ | ५ | २ | - | - | - | - |
| | | **एकूण नाशिक जिल्हा** | **८३** | **७** | **२६** | **२६** | **१६** | **५** | **३** | **-** | **-** |
| २) | बुलढाणा | जळगाव - जामोद | ३४ | - | ४ | १५ | १० | ४ | १ | - | - |
| | | संग्रामपूर | ३५ | ३ | ५ | १० | १४ | - | १ | - | - |
| | | एकूण | ६९ | ३ | ९ | २५ | २४ | ४ | २ | १ | १ |
| | | **एकूण बुलढाणा जिल्हा** | **१५२** | **१०** | **३५** | **५१** | **४०** | **९** | **५** | **१** | **१** |

झालेल्या एकूण १५२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियापैकी केवळ ४५ म्हणजे ३०% शस्त्रक्रिया ह्या २ अपत्यावर झालेल्या आहेत. ३ अपत्यानंतर ५१ म्हणजे ३४% शस्त्रक्रिया झाल्या असून ४ अपत्यानंतर ६% तर ६ अपत्यांवर ३ % आणि ७ व ८ अपत्यानंतर प्रत्येकी १ शस्त्रक्रिया झालेली आढळली आहे.




वस्तुतः कुटुंब नियोजनाचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी केलेल्या एकूण शस्त्रक्रियांच्या ८०% शस्त्रक्रिया २ अपत्यांवर होणे अपेक्षित असते. अशा परिस्थितीत एकूण २ अपत्यांवर झालेले काम हे ५०% नी कमी झालेले आहे. एकूण शस्त्रक्रियांपैकी ३ अपत्यांपर्यंत झालेल्या शस्त्रक्रियाही फक्त ६३% आहेत.

## ४.५ जननक्षम जोडपी व शस्त्रक्रिया

जननक्षम जोडप्यांपैकी शस्त्रक्रिया झालेल्यांचे प्रमाण पाहिले असता ते नाशिक जिल्ह्यात ६७ %. असल्याचे आढळते. बुलढाणा जिल्ह्यात हे प्रमाण ५५% आहे.


जननक्षम जोडप्यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

### तक्ता क्रमांक - १२

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण जोडपी | जननक्षम जोडपी | शस्त्रक्रिया झालेली जोडपी | % |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ५७ | ५५ | ३४ | ६२ |
| | | २) पेठ | १७ | १२ | ११ | ९२ |
| | | ३) सुरगाणा | २२ | १७ | १३ | ७६ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ४५ | ३९ | २५ | ६४ |
| | | **एकूण नाशिक जिल्हा** | **१४१** | **१२३** | **८३** | **६७** |
| २) | बुलढाणा | जळगाव- जामोद | ७१४ | ६० | ३४ | ५७ |
| | | संग्रामपूर | ८४ | ८० | ३५ | ४४ |
| | | एकूण | १५० | १४० | ६९ | ४९ |
| | | **एकूण बुलढाणा जिल्हा** | **२९१** | **२६३** | **१५२** | **५८** |

वरील तक्त्यावरून पेठ तालुक्यात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे दिसते. पाहणी केलेल्या व जननक्षम असलेल्या जोडप्यापैकी ९२% जोडप्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्याचे आढळते. सुरगाणा तालुक्यात ७६% जननक्षम जोडप्यांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. मात्र इगतपुरी, दिंडोरी व निफाड तालुक्यात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे प्रमाण बरेच कमी आहे. जवळजवळ ४०% जननक्षम जोडपी अद्यापही शस्त्रक्रिया करण्याची बाकी आहेत.

थोडक्यात नाशिक जिल्ह्यातील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे कामही फक्त उद्दीष्टाचे पेक्षा कमी आहे एवढेच नव्हे तर ते बरेच मागे आहे.




बुलढाणा जिल्ह्यातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे काम तर नाशिक जिल्ह्यापेक्षाही मागे आहे असे दिसते.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद तालुक्यामध्ये पहाणी केलेल्या जननक्षम जोडप्यांपैकी फक्त ५७ % जोडप्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतली असून संग्रामपूर तालुक्यात हे प्रमाण फक्त ४४% आहे. बुलढाणा जिल्ह्यात जननक्षम जोडप्यांपैकी निम्या जोडप्यांच्या शस्त्रक्रिया होणे बाकी आहे.

## ४.६ दोन अपत्यावर शस्त्रक्रिया

एकुण झालेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियापैकी ८० % शस्त्रक्रिया २ अपत्यापर्यंत झाल्यास १०० % काम पूर्ण झाले असे म्हणता येते. नाशिक व बुलढाणा या दोन जिल्ह्यातील १५२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियापैकी फक्त ४५ म्हणजे ३० % शस्त्रक्रिया १ किंवा २ अपत्यांवर झालेल्या आढळतात. खरेतर १५२ शस्त्रक्रियांपैकी १२१ ( ८० % ) शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर होणे अपेक्षित होते. म्हणजेच पाहणीमध्ये उद्दीष्टाच्या केवळ ३० % काम पूर्ण झाले असे म्हणता येईल.

नाशिक जिल्ह्यात एकूण झालेल्या ८३ शस्त्रक्रियांपैकी ३३ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर झाल्या आहेत. हे काम १०० % पूर्ण होण्यासाठी ६६ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर होणे आवश्यक होते म्हणजेच नाशिक जिल्ह्यात ५० % च उद्दीष्ट पूर्ण झाल्याचे दिसते.

बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या एकूण ६९ शस्त्रक्रियांपैकी केवळ १२ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर झाल्या आहेत. येथे उद्दीष्टपूर्तीसाठी ५५ शस्त्रक्रिया होणे अपेक्षित होते. येथे हे काम फक्त २२% पूर्ण झाल्याचे आढळले.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात एकूण ३४ शस्त्रक्रिया झालेल्या असून त्यापैकी २७ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर होणे अपेक्षित होते. परंतू तेथे ४ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर झाल्या असल्याने येथे केवळ १५ % उद्दीष्ट पूर्ण झाले असे म्हणावे लागते.

पेठ तालुक्यात एकूण ११ शस्त्रक्रिया झाल्या आहेत त्यापैकी ९ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर होणे अपेक्षित असताना तेथे ६ शस्त्रक्रिया ह्या अटी पूर्ण करणाऱ्या आहेत. म्हणजेच पेठ तालुक्यात हे काम ६७ % पूर्ण आहे.

सुरगाणा तालुक्यात एकूण १३ शस्त्रक्रिया झाल्या असून त्यापैकी १० शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर व्हावयास पाहिजे होत्या परंतू तेथे ५ शस्त्रक्रिया ह्या वर्गात मोडत असून हे काम ५० % पूर्ण झाले आहे.

दिंडोरी तालुक्यात २५ शस्त्रक्रिया झालेल्या असून त्यापैकी २० शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर होणे आवश्यक होते. हे काम येथे १८ शस्त्रक्रिया होऊन ९० % पूर्ण झाले आहे.

गुणात्मक कामाचा विचार करता नाशिक जिल्ह्यात दिंडोरी तालुक्याचा प्रथम क्रम लागतो.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद तालुक्यात एकूण ३४ शस्त्रक्रिया झाल्या असून पैकी फक्त ४ शस्त्रक्रिया १ वा २ अपत्यांवर झाल्या आहेत. येथे २७ शस्त्रक्रिया होणे आवश्यक होते म्हणजे येथे १५ % काम पूर्ण झाले असल्याचे निदर्शनास आले.

संग्रामपूर तालुक्यात एकूण ३५ शस्त्रक्रिया झाल्या असून १ वा २ अपत्यांवर ८ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. येथे २९% काम पूर्ण झाल्याचे दिसते.

थोडक्यात बुलढाणा जिल्ह्यातील दोन्ही तालुक्यांची कार्यक्षमता सारखीच खालच्या पातळीवर आहे.

पाहणी केलेल्या नाशिक व बुलढाणा जिल्ह्याच्या संख्यात्मक व गुणात्मक कामाची तुलना खालील तक्त्यावरून करता येईल.

**तक्ता क्रमांक - १३**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकुण जननक्षम जोडपी | झालेल्या एकुण शस्त्रक्रिया | % | २ अपत्यावर अपेक्षित शस्त्रक्रिया (८०%) | २ अपत्यावर झालेल्या शस्त्रक्रिया | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ५५ | ३४ | ६२ | २७ | ४ | १५ |
| | | २) पेठ | १२ | ११ | ९२ | ९ | ६ | ६७ |
| | | ३) सुरगाणा | १७ | १३ | ७६ | १० | ५ | ५० |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३९ | २५ | ६४ | २० | १८ | ९० |
| | **एकूण** | **नाशिक** | **१२३** | **८३** | **६७** | **६६** | **३३** | **५०** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६० | ३४ | ५७ | २७ | ४ | १५ |
| | | संग्रामपूर | ८० | ३५ | ४४ | २८ | ८ | २९ |
| | | | १४० | ६९ | ४९ | ५५ | १२ | २२ |
| | **एकूण** | **बुलढाणा** | **२६३** | **१५२** | **५८** | **१२१** | **४५** | **३७** |

वरील तक्त्यावरून असे दिसते की नाशिक व बुलढाणा जिल्ह्यातील पाहणी केलेल्या ७ तालुक्यात संख्यात्मकदृष्ट्या जरी पेठ तालुक्यात सर्वात जास्त काम झाले असले तरी गुणात्मकदृष्टया दिंडोरी व निफाड तालुक्याचा क्रम पहिला लागतो. त्यानंतर अनुक्रमे पेठ व सुरगाणा यांचा क्रम आहे व उरलेल्या इगतपुरी जळगाव-जामोद ह्या दोन तालुक्यात एकूण जननक्षम जोडप्यांपैकी ५५ ते ६० % शस्त्रक्रिया झाल्या असल्या तरी २ अपत्यांवर फक्त १५% शस्त्रक्रिया झाल्या आहेत, ३ अपत्यावर इगतपुरीमध्ये ३८% व जळगाव-जामोदमध्ये ४४ %, ४ अपत्यावर इगतपुरीत ३२% व जळगाव-जामोदमध्ये २९%, ५ अपत्यावर इगतपुरीत १५% व जळगाव-जामोद मध्ये २९ %, शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

६ अपत्यावर इगतपुरी व जळगाव-जामोदमध्ये प्रत्येकी १ शस्त्रक्रिया झालेली असून संग्रामपूर तालुक्यात ७ व ८ अपत्यानंतर १ शस्त्रक्रिया झालेली आहे.

अशा प्रकारे जास्त मुले झाल्यानंतर शस्त्रक्रिया झाल्याने कुटुंबनियोजन केलेल्या जोडप्यांची संख्या वाढत असली तरी कुटुंबाचे कल्याण मात्र फारसे होत नाही.

## ४.७ साक्षरता व कुटुंब नियोजन

शिक्षणामुळे आधुनिक विचारसरणी स्विकारण्याचा कल वाढतो ह्या धारणेनुसार जननक्षम जोडपी व त्यांची साक्षरता यांचा अभ्यास केल्यास खालील परिस्थिती आढळते.

### तक्ता क्रमांक - १४

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | जोडपी जननक्षम | लाभार्थी साक्षर | % (गुणानुक्रम) | शस्त्रक्रिया | % (गुणानुक्रम) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ५५ | १७ | ३१ (३) | ३४ | ६२ (४) |
| | | २) पेठ | १२ | ७ | ५८ (१) | ११ | ९२ (१) |
| | | ३) सुरगाणा | १७ | ८ | ४७ (२) | १३ | ७६ (२) |
| | | ४) दिंडोरी-निफाड | ३९ | १२ | ३१ (३) | २५ | ६४ (३) |
| | | **एकूण** | **१२३** | **४४** | **३६** | **८३** | **६७** |
| २) | बुलढाणा | जळगाव जामोद | ६० | १६ | २७ | ३४ | ५६ |
| | | संग्रामपूर | ८० | ४५ | ५६ | ३५ | ४४ |
| | | **एकूण** | **१४०** | **६१** | **४४** | **६९** | **४९** |
| | | **एकूण** | **२६३** | **१०५** | **८०** | **१५२** | **५८** |

नाशिक जिल्ह्यात पेठ तालुक्यात जननक्षम जोडप्यांचे साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त (५८ %) असून तेथेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे प्रमाण सर्वात जास्त (९२ %) आहे.

त्यानंतर सुरगाणा तालुक्याचा क्रम लागत असून तेथेही साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. इगतपुरी व दिंडोरी-निफाड तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण साधारणपणे सारखेच असून कुटुंब नियोजनाचे प्रमाणही सारखेच आहे.

यावरून असे वाटते की, साक्षरतेचा व कुटुंब नियोजनाचा कल एकाच दिशेने जातो. परंतु ह्या उलट परिस्थिती बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात आढळते.

बुलढाणा जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण जळगाव-जामोद तालुक्यात कमी दिसते तर कुटुंब नियोजनाचे प्रमाण जास्त दिसते व ह्याउलट संग्रामपूरमध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त असून कुटुंब नियोजनाचे प्रमाण कमी आहे.

त्यामुळे जननक्षम जोडप्यांच्या साक्षरतेनुसार कुटुंब नियोजनाचा कल बदलतो असे म्हटले तरी त्याला कधीतरी अपवादही दिसतो.

## कुटुंब सदस्यांची साक्षरता व कुटुंब नियोजन

फक्त जननक्षम जोडप्यांच्याच नव्हे तर कुटुंबातील इतर सदस्यांचा म्हणजेच शैक्षणिक पार्श्वभूमीचा कुटुंब नियोजनाशी सहसंबंध असतो का हे पाहीले तर खालील स्थिती निदर्शनास आली.

**तक्ता क्रमांक - १५**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | जननक्षम जोडपी | झालेल्या शस्त्रक्रिया | % | कुटुंब सदस्यांची साक्षरता % | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पुरुष | स्त्री |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ५५ | ३४ | ६२ | २२ | १९ |
| | | २) पेठ | १२ | ११ | ९२ | २२ | १४ |
| | | ३) सुरगाणा | १७ | १३ | ७६ | ४४ | १९ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३९ | २५ | ६४ | २७ | २२ |
| | | **एकूण** | **१२३** | **८३** | **६७** | **२७** | **२०** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६० | ३४ | ५६ | ३५ | ३६ |
| | | संग्रामपूर | ८० | ३५ | ४४ | ५८ | ४१ |
| | | एकूण | १४० | ६९ | ५०% | ४६ | ३९ |

वरील तक्त्यानुसार कुटुंबाची शैक्षणिक पार्श्वभूमी व कुटुंब नियोजन ह्यांचा सहसंबंध आहेच असे म्हणता येत नाही.

## ४.८ कुटुंबाचे उत्पन्न व कुटुंब नियोजन

कुटुंबाचे उत्पन्न कमी/जास्त असेल त्यानुसार कुटुंब नियोजनाचे प्रमाण कमी/जास्त होते का हे पडताळले असता, आढळलेली स्थिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक - १६**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | पहाणी केलेली कुटुंबे | जननक्षम जोडपी | झालेल्या शस्त्रक्रिया | झालेल्या शस्त्रक्रियांपैकी रु. १० हजार पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेली जोडपी | स्तंभ ६ चे स्तंभ ५ शी % | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १० हजारपेक्षा जास्त असलेली एकूण कुटुंबे | स्तंभ ९ चे स्तंभ ४ शी % | झालेल्या शस्त्रक्रियापैकी १० हजार पेक्षा जास्त उत्पन्नाच्या कुटुंबांची % | स्तंभ ७ चे स्तंभ ९ शी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | ५५ | ३४ | २७ | ६२ | ३८ | ७९ | ७९ | ७१ |
| | | २) पेठ | ९ | १२ | ११ | ३ | ९२ | ८ | ८९ | २७ | ३८ |
| | | ३) सुरगाणा | १६ | १७ | १३ | ११ | ७६ | १३ | ८१ | ८५ | ८५ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | ३९ | २५ | २१ | ६४ | २९ | ७८ | ८४ | ७२ |
| | | **एकूण जिल्हा** | **११०** | **१२३** | **८३** | **६२** | **६७** | **८८** | **८०** | **७५** | **७०** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६२ | ६० | ३४ | १६ | ५६ | ३३ | ५३ | ४७ | ४८ |
| | | संग्रामपूर | ७६ | ८० | ३५ | ३१ | ४४ | २६ | ३४ | ४३ | ५८ |
| | | **एकूण जिल्हा** | **१३८** | **१४०** | **६९** | **४७** | **४९** | **५९** | **४३** | **४५** | **५३** |
| | | **एकूण** | **२४८** | **२६३** | **१५२** | **१०९** | **५८** | **१४७** | **५९** | **६१** | **६३** |

ह्यावरून रुपये १० हजारापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्याचे प्रमाण ६३% आसपास आहे. एकूण झालेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी ६१% शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १० हजारापेक्षा जास्त असल्याचे आढळले. नाशिक जिल्ह्यामध्ये एकुण झालेल्या ८३ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी ६२ शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १० हजारापेक्षा जास्त होते.

याचा अर्थ नाशिक जिल्ह्यात रुपये १० हजार वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबाचे पेठ तालुका वगळता कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्याचे प्रमाण ७०% जास्त आहे. म्हणजेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्याकडे यांचा कल अधिक दिसतो. परंतु पेठ तालुका व बुलढाणा जिल्ह्यात असे चित्र दिसत नाही. तेथे वार्षिक उत्पन्न वाढले म्हणून शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढलेले दिसत नाही.

नाशिक जिल्ह्यात पेठ तालुका वगळता इतर तिन्ही तालुक्यात जवळपास ८०% शस्त्रक्रिया वार्षिक उत्पन्न रुपये १० हजारापेक्षा असलेल्यांच्या झाल्या आहेत तर बुलढाणा जिल्ह्यात दोन्ही तालुक्यात हे प्रमाण ५२% च्या आसपास आहे.

नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुका वगळता इतर तालुक्यात वार्षिक उत्पन्न रुपये १० हजारपेक्षा जास्त असलेल्या जवळपास ७०% जोडप्यांनी व बुलढाणा जिल्ह्यात सुमारे ५२% जोडप्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेतल्या आहेत असे दिसते.

एकूणच उत्पन्नाचा कुटुंब नियोजनाचा परस्पर संबंध आहे असे ठामपणे म्हणता येत नाही.

## ४.९ व्यवसाय व कुटुंब नियोजन

कुटुंब मर्यादित ठेवण्याची इच्छा व्यवसायाशी निगडीत आहे की नाही याचा शोध घेतला असता आढळलेली माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक - १७**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण कुटुंबे | जननक्षम जोडपी | झालेल्या शस्त्रक्रिया | % | शेती | | मजुरी | | व्यापार | नोकरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कुटुंबे | % | कुटुंबे | % | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ४८ | ५५ | ३४ | ६२ | १४ | २९ | ३१ | ६४ | १ | २ |
| | | २) पेठ | ९ | १२ | ११ | ९२ | ९ | १०० | - | - | - | - |
| | | ३) सुरगाणा | १६ | १७ | १३ | ७६ | १३ | ८१ | ३ | १९ | - | - |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ३७ | ३९ | २५ | ६४ | ६ | १६ | ३० | ८१ | १ | - |
| | | **एकूण** | **११०** | **१२३** | **८३** | **६७** | **४२** | **३८** | **६४** | **५८** | **२** | **२** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६२ | ६० | ३४ | ५६ | २२ | ३५ | ३७ | ६० | १ | २ |
| | | संग्रामपूर | ७६ | ८० | ३५ | ४४ | १६ | २१ | ५४ | ७१ | २ | ४ |
| | | **एकूण** | **१३८** | **१४०** | **६९** | **४९** | **३८** | **२७** | **९** | **६६** | **३** | **६** |
| | | | **२४८** | **२६३** | **१५२** | **५८** | **८०** | **३२** | **१५५** | **६३** | | |

यावरून व्यवसाय व कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया परस्पराशी संबंधीत नसतात असे दिसते. शेती व मजुरीमध्ये जास्तीत जास्त कुटुंबे गुंतलेली असली व शेतीला मनुष्यबळ हवे म्हणुन कुटुंब नियोजन करत नाही असे काही कुटुंबातून सांगण्यात आले असले तरी असा काही संबंध असल्याचे वरील आकडेवारीवरून सिध्द होत नाही.

## ४.१० जमात निहाय कुटुंब नियोजन

पाहणी केलेल्या २४८ आदिवासी कुटुंबांचे जमात निहाय वर्गीकरण खालील तक्त्यात दिले आहे.

**तक्ता क्रमांक - १८**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | | कोकणा | महादेव कोळी | महादेव ठाकूर | वारली | गोंड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | नाशिक | १) इगतपुरी | श. केलेले | - | १४ | १८ | - | - |
| | | | श. न केलेले | - | २ | १४ | - | - |
| | | | एकूण | - | १६ | ३२ | - | - |
| | | | % | - | ८८ | ५७ | - | - |
| | | २) पेठ | श. केलेले | - | १ | - | ५ | १ |
| | | | श. न केलेले | - | - | - | ३ | - |
| | | | एकूण | - | १ | - | ८ | १ |
| | | | % | - | १०० | - | ६२ | १०० |
| | | ३) दिंडोरी-निफाड | श. केलेले | - | २६ | - | - | - |
| | | | श. न केलेले | - | १३ | - | - | - |
| | | | एकूण | - | ३९ | - | - | - |
| | | | % | - | ६७ | - | - | - |
| | | ४) सुरगाणा | श. केलेले | १२ | २ | - | - | - |
| | | | श. न केलेले | ३ | - | - | - | - |
| | | | एकूण | १५ | २ | - | - | - |
| | | | % | ८० | १०० | - | - | - |

## तक्ता क्रमांक - १९

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | | पावरा | कोरकू | भिल्ल | बारेला | गोंड | जमरा | मातंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बुलढाणा | १) जळगाव-जामोद | श.केलेले | १० | १० | ९ | २ | - | - | - |
| | | | श. न केलेले | ९ | ११ | ७ | ४ | - | - | - |
| | | | एकूण | १९ | २१ | १६ | ६ | - | - | - |
| | | | % | ५३ | ४७ | ५६ | ३३ | - | - | - |
| | | २) संग्रामपूर | श.केलेले | ० | १६ | १७ | ० | ० | १ | १ |
| | | | श. न केलेले | १ | १६ | २१ | १ | १ | ० | ० |
| | | | **एकूण** | **१** | **३२** | **३८** | **१** | **१** | **१** | **१** |
| | | | % | ० | ५० | ४४ | ० | ० | १०० | १०० |


वरील तक्त्यावरून असे दिसते की, पाहणी केलेल्या एकूण २४८ कुटुंबापैकी सर्वात जास्त म्हणजे ५८ (२३ %) कुटुंबे, महादेव कोळी जमातीची असून त्याखालोखाल भिल्ल ५४ (२२%) व कोरकू ५३ (२१%), महादेव ठाकूर जमातीची ३२ (१३ %), पावरा जमातीची २० (८ %) कुटुंबे असून कोकणाची १५ (६%) कुटुंबे आहेत. बाकीची वारली ५, गोंड २, बारेला ६, जमरा १, मातंग असल्याचे आढळले.

जमरा व मातंग जमातीचे प्रत्येकी १ कुटुंब असल्याने त्यांच्या १००% शस्त्रक्रिया झाल्याचे दिसत असले तरी कोकणा जमातीच्या सर्वात जास्त म्हणजे ८० % कुटुंबानी शस्त्रक्रिया करून घेतली असून महादेव कोळींच्या कुटुंबांपैकी ७२%, वारलीच्या कुटुंबापैकी ६२%, महादेव ठाकूर जमातीच्या कुटुंबापैकी ५६%, भिल्ल, पावरा व कोरकू जमातीच्या कुटुंबापैकी ४९ ते ५०% व बारेला जमातीच्या २९% कुटुंबांनी शस्त्रक्रिया करून घेतल्या आहेत.

कोरकू, भिल्ल व पावरा ह्या जमातीमध्ये अद्यापही ५०% च्या आसपास कुटुंबेच शस्त्रक्रिया करण्यास धजावतात उरलेल्या ५०% कुटुंबांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्याचे महत्त्व अद्यापही पटलेले नाही. शिवाय ज्या बुलढाणा जिल्ह्यात ह्या ३ जमाती आहेत त्या जिल्ह्यात झालेल्या एकूण कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी ९०% शस्त्रक्रिया ह्याच ३ जमातीनी केल्या आहेत व ह्या जमातीच्या ८३% शस्त्रक्रिया ३ अपत्यापेक्षा जास्त अपत्यानंतर करण्यात आल्या आहेत की ज्यांचे गुणात्मक मूल्य फार कमी आहे.

## ४.११ कुटुंब नियोजन न करण्याची कारणे

नाशिक व बुलढाणा ह्या २ जिल्ह्यातील २६३ जननक्षम जोडप्यांची पाहणी केली असता ४२% कुटुंबांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली नाही असे आढळले, शस्त्रक्रिया न करून घेण्याच्या मागच्या कारणांचा आढावा घेतला असता आढळलेली परिस्थिती खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.




## कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न करण्याचे कारणानुसार वर्गीकरण.

### तक्ता क्रमांक - २०

| | | | | | शस्त्रक्रिया न करण्याची कारणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | जननक्षम जोडपी | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न केलेली जोडपी | शस्त्रक्रिया न केलेल्यांचे एकूण प्रमाण | आणखी मुले | मुलगा हवा | मुलगी हवी | अपत्य नाही | सीझर | अशक्य | नवविवाहित | अशक्त |
| १) | नाशिक | १२३ | ४० | ३३% | १८ | १० | १ | - | - | - | ६ | ५ |
| २) | बुलढाणा | १४० | ७१ | ५१% | ४३ | २२ | २ | २ | १ | १ | - | - |
| | **एकूण** | **२६३** | **१११** | **४२%** | **६१** | **३२** | **३** | **२** | **१** | **१** | **६** | **५** |

वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया न करणाऱ्या ५९% जोडप्यांना आणखी मुले हवी असल्याने, तर ३१% जोडप्यांना मुलगाच हवा असल्याने किंवा १/२ मुलगे असले तरी जास्त मुलगे हवे असल्याने त्यांनी कुटुंब नियोजन केलेले नाही. काही कुटुंबानी तर शेतीकामासाठी, रोजंदारीसाठी अधिक मुलांची आवश्यकता असल्याचे सांगितले तर म्हातारपणची काठी व वंशाचा दिवा म्हणून पुरुषलिंगी अपत्यच जन्माला यावे अशी आस आदिवासी कुटुंबानाही मोठ्या प्रमाणात आहे. तर मुलगी व्हावी म्हणून कुटुंब नियोजन न करणाऱ्यांचे प्रमाण ३% म्हणजे मुलगा हवा असणाऱ्या कुटूबांच्या १/१० आहे.




थोडक्यात आणखी मुले व मुलगे हवी असलेली ९३ कुटुंबे (६१ + ३२) व २ अपत्यापेक्षा जास्त मुले झाल्यावर शस्त्रक्रिया करून घेणारी १०७ कुटुंबे अशा एकूण २०० कुटुंबांना म्हणजेच पाहणी केलेल्या एकुण २६३ जननक्षम जोडप्यांपैकी ७६% कुटुंबांना २ पेक्षा जास्ती मुले जन्माला घालणे आवश्यक वाटते.

या सर्व परिस्थितीवरून मोठ्या कुटुंबांचे होणारे दुष्परीणाम, अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या मुलभूत गरजासुध्दा भागविता न येणारी आर्थिक कुवत, जास्त मुलाबाळांकडे लक्ष देता येत नसल्याने त्यांची होत असलेली आबाळ, ह्या सर्वाच्या परिणामी कुपोषण होऊन होणारे मृत्यू व मुलांच्या संख्येगणीक वाढत जाणारे दारिद्रय ह्या बाबींचे नीट आकलन करून देण्यात व कुटुंब नियोजनाचे महत्त्वच नव्हे तर त्याची निकड आदिवासींच्या गळी उतरविण्यात कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणारी यंत्रणा कमी पडते असे म्हणण्यावाचून पर्याय उरत नाही.

६-७ मुले असूनही पुन्हा गरोदर असलेली ४५ वयाच्या आसपासची माता व तिच्या मागे फिरणारे अर्धविटके कपडे व भुकेले चेहरे मिरवणारे लेंढार कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणाऱ्या यंत्रणेची ह्या बाबतची उदासीनता निदर्शनास आणून देते व असे चित्र आदिवासी क्षेत्रात अनेकदा दृष्टीस पडते.

## ४.१२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये व्यतिरीक्तची साधने

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये व्यतिरीक्त कुटुंब नियोजनाच्या साधनांबाबत आदिवासी कुटुंबांना फारशी माहिती नाही व काहींना माहिती असली तरी त्यांचा वापर करणारी कुटुंबे अत्यल्प असल्याचे दिसते.

पाळणा लांबविणारी किंवा २ मुलात अंतर ठेवणारी कॉपर टी, एचआयव्ही व एड्सपासून दूर रहाण्यास मदत करणारे निरोध वा तातडीच्या वेळी गर्भधारणा रोखण्यासाठी घ्यावयाच्या गर्भनिरोधक गोळ्या किंवा नियमीत तोंडावाटे घ्यावयाच्या माला-डी सारख्या गोळ्या इत्यादी साधनांचा वापर होत नाही व त्याबाबत माहिती असली तरी त्यांची गांभीर्याने दखलही घेतली जात नाही.

### तक्ता क्रमांक - २१

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | पाहणी केलेली जोडपी | शस्त्रक्रियेव्यतिरीक्त साधनांची माहिती | | वापर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | होय | नाही (%) | |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ५७ | २६ | ३१ (५४) | नाही |
| | | २) पेठ | १७ | ८ | ९ (५३) | नाही |
| | | ३) सुरगाणा | २२ | ९ | १३ (५२) | नाही |
| | | ४) दिंडोरी / निफाड | ४५ | १५ | ३० (६७) | नाही |
| | | **एकूण** | **१४१** | **५८ (४१%)** | **८३ (५९%)** | |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ६६ | ४८ | १८ (२७) | नाही |
| | | संग्रामपूर | ८४ | ७२ | १२ (१४) | नाही |
| | | **एकूण** | **१५०** | **१२० (८०%)** | **३० (२०)** | |
| | | **एकूण** | **२९१** | **१७८ (६१%)** | **११३ (३९%)** | |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सर्व कुटुंबातील सर्वच जोडप्यांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिये व्यतिरीक्तच्या इतर पध्दतींची माहिती आहे असे नाही. फक्त ६१% कुटुंबांना इतर साधनांची माहिती आहे व ३९% कुटुंबांना कोणत्याही साधनांची माहिती नाही.

नाशिक जिल्ह्यात ४१% कुटुंबांना व बुलढाणा जिल्ह्यात ८०% कुटुंबांना इतर साधनांची माहिती आहे.

अर्थात इतर साधनांची माहिती असलेल्या जोडप्यांपैकी ८०% जोडप्यांना फक्त निरोध विषयी माहिती आहे. १५% जोडप्यांना तांबी व निरोधची माहिती आहे व तोंडाने नियमीत घ्यावयाच्या गोळ्यांसह इतर साधनांची माहिती असलेली जोडपी ५% आहेत.

**मात्र माहिती असली तरी कोणतेही जोडपे ह्यातले कुठलेही साधन वापरत नसल्याचे समजले.** ह्याची विशेष नोंद घेतली पाहीजे.

याचा अर्थ कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेव्यतिरीक्तच्या इतर साधनांचा प्रचार आदिवासींपर्यंत पोचत नाही तसेच त्यांच्या उपयोगाच्या वेगवेगळ्या फायद्याचे महत्वाची त्यांना जाणीव करून दिलेली नाही असा होतो.

**दुर्गम भागातील वास्तव्यामुळे बालकांना वेळेवर मिळत नसलेल्या वैद्यकिय सेवेमुळे मुले दगावण्याची भिती पालकांना असते, त्यांच्या जगण्याचा पालकांना भरवसा नसतो म्हणूनही आदिवासी समाज मुले लहान असेपर्यंत शस्त्रक्रिया करून घेण्यास नकार देतो** व त्यामुळे मधल्या काळात आणखी मुले जन्माला येत राहतात. याऐवजी मुले पुरेशी मोठी होईपर्यंत जर कॉपर टी, निरोध किंवा गोळ्यांचा वापर केला व योग्यवेळी तो थांबवून शस्त्रक्रिया करून घेतली तर मिळणाऱ्या सुरक्षिततेमुळे आदिवासी जोडपी आश्वस्त होतील व गरज भासल्यास पुन्हा मुल होऊ शकण्याचा पर्याय खुला असल्याने कुटुंब नियोजन करून घेण्यास उद्युक्त होतील.

तसेच लागोपाठ मुले झाली व त्यांच्यात ३ वर्षांपेक्षा कमी अंतर असले की ती शारिरीकदृष्ट्याही दुर्बल असतात व त्यांच्या देखभालीतही हेळसांड होते. ह्यासाठी महिलांना कॉपर टी च्या वापरासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे म्हणजे मुलांमध्ये योग्य ते अंतर राहील व माता व बालक ह्या दोघांच्या आरोग्याचे रक्षण होईल.

तरी कुटुंब नियोजनाच्या इतर साधनांचा **पाडा स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्था व आशा** मार्फत प्रसार करणे आवश्यक आहे. तसेच कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेसाठी जसे उद्दीष्ट देण्यात येते तसे तांबीचे / गोळ्यांचे उद्दीष्ट देऊन अशा केसेस आणणाऱ्यांना प्रत्येक केस मागे प्रोत्साहन भत्ता दिला गेला पाहीजे की जेणेकरून हे काम स्वयंस्फूर्तीने केले जाईल.

## ४.१३ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे झालेले विपरीत परिणाम

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर महिलांना व पुरुषांना काही त्रास होऊ शकतो. असा त्रास शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींना झाला आहे का याची पाहणी केली असता खालील परिस्थीती आढळली.

**तक्ता क्रमांक - २२**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | झालेल्या शस्त्रक्रिया | एकूण शस्त्रक्रियेपैकी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | विपरीत परिणाम झालेल्या | विपरीत परिणाम न झालेल्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | नाशिक | १) इगतपुरी | ३४ | ६ | २८ |
| | | २) पेठ | ११ | २ | ९ |
| | | ३) सुरगाणा | १३ | २ | ११ |
| | | ४) दिंडोरी / निफाड | २५ | ३ | २२ |
| | | **एकूण** | **८३** | **१३** | **७०** |
| २) | बुलढाणा | जळगाव-जामोद | ३४ | - | ३४ |
| | | संग्रामपूर | ३५ | २ | ३३ |
| | | एकूण | ६९ | २ | ६७ |
| | | **एकूण** | **१५२** | **१५** | **१३७** |

एकूण झालेल्या १५२ शस्त्रक्रियांपैकी **१५ शस्त्रक्रियांचा परिणाम** विपरीत दिसला. हे प्रमाण १०% आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अशा विपरीत तक्रारी उद्‌भवणे ही दखल घेण्याजोगी बाब आहे. ह्या विपरीत परिणाम झालेल्या सर्व शस्त्रक्रिया शासकीय यंत्रणेमार्फत केलेल्या आहेत.

विपरीत परिणाम झालेल्या शस्त्रक्रियांचे सर्वात जास्त प्रमाण नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात आढळते.

ह्या विपरीत परिणामांच्या केसेसमधील मुख्य तक्रार हा शस्त्रक्रियेनंतर होणारी पोटदुखी, कंबरदुखी, पाठदुखी ही आहे.

ह्या शिवाय काही केसेसमध्ये अति रक्तस्त्राव होणे, ऑपरेशन केलेल्या जागेभोवती सूज येणे अशा प्रकारच्या तक्रारी देखील आहेत. अशक्तपणा जाणवणे ही तर अगदी सर्वसाधारण बाब आहे. एका महिलेच्या पोटात शस्त्रक्रियेनंतर गाठ उद्‌भवल्याने ती काढण्यासाठी नवीन वेगळी शस्त्रक्रिया केल्याची घटना आहे.

अशा घटना घडू नयेत ह्यासाठी शस्त्रक्रियेवेळी पुरेशी दक्षता घेणे आवश्यक आहे.

## ४.१४ अयशस्वी शस्त्रक्रिया

पाहणी केलेल्या कुटुंबातील एकूण १५२ शस्त्रक्रियांच्या लाभार्थीपैकी एक शस्त्रक्रिया अयशस्वी झाली असे समजले. अयशस्वी शस्त्रक्रिया ही पुरुषनसबंदी शस्त्रक्रिया असून ती शासकीय संस्थेतच केलेली होती. ह्या लाभार्थीने शस्त्रक्रीया करून घेतल्यानंतर त्याचे पत्नीस गर्भधारणा झाल्यामुळे त्या महिलेचीही शस्त्रक्रिया करण्यात आली. ह्याबाबतीत एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे **पुरुषनसबंदी करून घेतल्यावर काही ठरावीक कालावधीपर्यंत निरोध वापरणे आवश्यक असते**. परंतु ह्या बाबीकडे कोणीही गांभीर्याने पहात नाही व त्यातील गांभीर्याची लाभार्थ्यांना पुरेशी जाणीव करून दिली जात नाही. केवळ पुरुषनसबंदीचे उद्दीष्ट पुरे करण्यासाठी लाभार्थी गाठुन शस्त्रक्रिया होतात. लाभार्थींच्या गावात 'एएनएम' महिन्यातून २ ते ४ वेळा जात असते पण एकूण झालेल्या पुरुषनसबंदीपैकी फारतर फार १ % लाभार्थी शस्त्रक्रिये पश्चात निरोध वापरतात ह्याचा अर्थ गावात जाणाऱ्या 'एएनएम' लाभार्थींना मार्गदर्शन करत नाहीत असा होतो.

पुरुषनसबंदी शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यास गर्भधारणा होण्यापुरतेच त्याचे परिणाम न होता **संबंधित महिलेस चारित्र्यहननास सामोरे जावे लागते** व प्रसंगी संसार उध्वस्त होतो ह्याची दखल घेतली गेली पाहिजे.

## ४.१५ ए.एन.एम. च्या भेटी (Auxilary Nurse Midewife)

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यानंतर काही समस्या उद्‌भवलेली नाही याची खात्री करून घेण्यासाठी व काही तक्रार असेल तर तिचे निराकरण करण्यासाठी शस्त्रक्रिया झालेल्या पेशंटला एएनएमने भेटी देणे गरजेचे आहे. काही ठिकाणी एएनएम भेटी देतातही परंतु काही ठिकाणी एएनएम भेटी देत नसल्याने उद्‌भवलेल्या तक्रारींवर उपाय केले जात नाहीत व समस्या तशाच रहातात.

नाशिक जिल्ह्यातील पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी दिंडोरी व निफाड तालुक्यात शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांपैकी २८% 'एएनएम' रुग्णांना भेटी देत नाहीत. हे प्रमाण सुरगाणा तालुक्यात १३% असून इगतपुरी तालुक्यात २१% आहे. ह्याचा अर्थ २० ते २५% रुग्णांना 'एएनएम'ची मदत मिळू शकत नाही. दुर्गम ठिकाणच्या आदिवासी वस्तीना भेटी देणाऱ्या एएनएमच्या कामावर अधिक देखरेख होणे आवश्यक आहे. अशा ठिकाणी एएनएम पोचली नाही तर अन्य डॉक्टरांचे मार्गदर्शन ही उपलब्ध होऊ शकत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात 'एएनएमच्या' भेटीसंदर्भात फारशा त्रुटी आढळल्या नाहीत.

## ४.१६ कुटुंब नियोजनाच्या आदिवासींच्या पारंपारिक पध्दती

आदिवासी, कुटुंब नियोजनासाठी शस्त्रक्रिया व अन्य साधनांचा वापर करणे ह्या आधुनिक पध्दती ऐवजी काही पारंपारिक पध्दती व झाड पाल्याचा उपयोग करतात. याबाबत जाणून घेण्यासाठी प्रयत्न केले असता नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी व पेठ तालुक्यातील काही कुटुंबानी अशा पध्दती अस्तित्वात असल्याची व त्याचा उपयोग होत असल्याची ग्वाही दिली परंतु त्याबाबत माहिती देण्याची टाळाटाळ केली व अशी माहिती गुप्त ठेवण्याची परंपरा असल्याचे सांगीतले.

## ४.१७ मानधन

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याबद्दल ही शस्त्रक्रिया शासकीय संस्थेत झाली असेल तर लाभार्थीला मानधन देण्यात येते. लाभार्थीस मानधन मिळाले की नाही याची पडताळणी केली असता १५२ शस्त्रक्रिया केलेल्या व्यक्तींपैकी २३ % लाभार्थींना काहीही मानधन मिळाले नाही असे समजले. मानधन न मिळालेल्या सर्वात जास्त लाभार्थींची संख्या बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात आढळली आहे. तेथे एकूण शस्त्रक्रियांपैकी ४३% लाभार्थींना मानधन मिळालेले नाही. तसेच मानधन मिळालेल्या बऱ्याच कुटुंबाना रुपये १०० / २०० इतके किरकोळ मानधन देण्यात आले आहे.

## प्रकरण क्रमांक ५

## - निष्कर्ष -

नाशिक व बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासीच्या कुटुंब नियोजना संदर्भात २६३ जननक्षम आदिवासी जोडप्यांची पाहणी केली असता खालील निष्कर्ष काढण्यात आले.

१. २६३ जननक्षम जोडप्यांपैकी १५२ जोडप्यांच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत व हे प्रमाण ६०% आहे.

२. यापैकी २ अपत्यावरील शस्त्रक्रिया फक्त ४५ असून हे प्रमाण उद्दिष्टाच्या केवळ ३० % आहे.

३. झालेल्या एकूण १५२ शस्त्रक्रियांपैकी ८६% शस्त्रक्रिया स्त्रियांच्या झाल्या असून पुरुषांच्या शस्त्रक्रियांचे प्रमाण फक्त १४ % आहे.

४. शस्त्रक्रिया न केलेल्या १११ जननक्षम जोडप्यांपैकी ५९ % जोडप्यांनी आणखी मुले हवी असल्याने व ३१% जोडप्यांनी मुलगा हवा म्हणून शस्त्रक्रिया केलेल्या नाहीत.

५. झालेल्या १५२ शस्त्रक्रियांपैकी जास्तीत जास्त म्हणजे ३३% शस्त्रक्रिया ३ अपत्यानंतर, २६% ४ अपत्यानंतर व २३% ५ अपत्यानंतर झाल्या आहेत.

६. शस्त्रक्रियेव्यतिरिक्त कुटुंब नियोजनाच्या अन्य साधनांची माहिती असलेली जोडपी अगदी नगण्य आहेत अन्य साधनांचा प्रचार झालेला नाही.

७. एकही जननक्षम जोडपे कुटुंब नियोजनांची अन्य साधने वापरत नाही.

८. पाहणी केलेल्या २४८ एकूण कुटुंबापैकी ९५% कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २० हजारापेक्षा कमी आहे.

९. ५२% कुटुंबे भूमिहिन आहेत.

१०. एकूण ७७% कुटुंबाची घरे कच्च्या स्वरुपाची असून ५४% कुटुंबाची घरे पूर्ण कच्ची असून २३% घरे अर्ध कच्ची आहेत.

११. ८५% कुटुंबे दवाखान्यात उपचार घेतात.

१२. शस्त्रक्रिया केलेल्या १०% जोडप्यांना शस्त्रक्रियेनंर शारीरिक त्रास भोगावा लागला आहे.

१३. शस्त्रक्रियेनंतर २५% रुग्णाना 'एएनएम' भेटी देत नाहीत. विशेष करून नाशिक जिल्ह्यात हे प्रमाण जास्त आहे.

१४. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर २३% जोडप्यांना काहीच मानधन मिळाले नाही व ज्यांना मानधन मिळाले त्यांना १०० / २०० रुपये इतकेच मानधन मिळाले. अत्यल्प कुटुंबाना योग्य मानधन मिळाले.

१५. झालेल्या १५२ शस्त्रक्रियांपैकी १ शस्त्रक्रिया अयशस्वी झाली व ती पुरुष नसबंदी होती.

१६. पुरुष नसबंदी नंतर ९९ % लाभार्थी निरोध वापर करत नाहीत.

१७. भेटी दिलेल्या २४८ कुटुंबांपैकी ४२% कुटुंबे साक्षर आहेत.

१८. महादेव कोळी कुटुंबापैकी ७४% वारली ६२% कुटुंबानी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

## प्रकरण क्रमांक - ६

# काही अडचणी व शिफारसी

१. कुटुंब नियोजनाचे महत्त्व आदिवासी समाजाला अद्याप पटलेले नाही. त्यासाठी फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाकडून अधिक काम होणे आवश्यक आहे.

२. कुटुंब नियोजनामध्ये स्त्रियांचा मोठा सहभाग दिसतो. खरेतर पुरुष नसबंदी, स्त्री नसबंदीपेक्षा अधिक सोपी असते. कमीत कमी त्रास होणारी असते. अल्पकाळात लाभार्थीस दैनंदिन जीवन सुरू करता येते, तसेच एक पुरुष नसबंदी ही साधारपणे ३ स्त्री नसबंदी बरोबर असल्याने तिचे गुणात्मक मूल्य अधिक असते. शिवाय आपत्काळात पुन्हा शस्त्रक्रीया करून अपत्य प्राप्तीचा लाभ घेता येतो. ह्या सर्व बाबी लक्षात घेऊन लाभार्थी पुरुष नसबंदीकडे आकर्षीत होण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी.

३. कुटुंब नियोजनाचे शस्त्रक्रीयेसाठी उद्युक्त करणाऱ्या कर्मचाऱ्याला जे मानधन देण्यात येते त्यात वाढ करण्यात यावी.

४. लाभार्थीला देण्यात येणारे मानधन अपत्यांच्या वाढत्या संख्येच्या प्रमाणात कमी होणारे असावे. हीच पध्दत प्रवृत्त करणाऱ्याच्या मानधनाबाबतही वापरावी.

५. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेव्यतिरिक्तच्या इतर साधनांबाबत आदिवासी अनभिज्ञ आहेत. त्यांना ह्या विविध साधनांचा वापर करण्याचे वेगवेगळे शिक्षण द्यावे व त्यासाठी प्रवृत्त करावे. पाळणा लांबविण्याचे पध्दतीमुळे असुरक्षीतपणाच्या भावनेतून जे आदिवासी शस्त्रक्रिया टाळतात ते कुटुंब नियोजनाकडे वळतील.

६. शस्त्रक्रिया अयशस्वी होऊ नये म्हणून शस्त्रक्रिया केल्यानंतर घ्यावयाची काळजी लाभार्थ्यांचे मनात पुन्हा पुन्हा बिंबवावी तसेच शस्त्रक्रियेनंतर 'एएनएम', मानकानुसार लाभार्थींना भेटी देण्यात टाळाटाळ करणार नाहीत ह्याकडे लक्ष द्यावे की जेणेकरून शस्त्रक्रियेचे काहीवेळा होणारे विपरीत परिणाम टाळता येतील.

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.